अेका जमीनदाराचा मुलगा, डॉक्टर झालेला. पंचविशीचा तरुण. ध्येयवादाने भारून जाऊन अेका कुग्रामात येतो. त्या परिसरात नसते पाणी, नसते जीवन, असते केवळ मृत्यूचे सावट, दारिद्र्य, उपासमार, थेंब थेंब पाण्यासाठी, अस्तित्वासाठी चाललेला संघर्ष. ते पाहून त्या क्षणी त्याचा निर्णय होतो की इथे जलजीवन आणायचेच.

या कार्यासाठी सुरुवातीला ना कुणाचे सहकार्य ना कसल्या सुविधा ! हा अतिरेकी असावा असा गावकऱ्यांना संशय. त्यांच्या शहरीपणाची, शिक्षणाची टर उडविली जाते. कुदळ तरी धरता येते कां ? असे विचारले जाते.

परंतु त्याचा निर्धार अभंग असतो आणि राजस्थानच्या त्या रणरणत्या उन्हात, थंडीवाऱ्यात अेकट्यानेच कुदळ घेऊन चार पाच महिने तो जोहड तलाव खणतो, थेंब थेंब पाण्याला वंचित झालेल्या गावकऱ्यांसाठी.

अखेर त्या भगीरथी प्रयत्नांचा, त्याच्या श्रमयज्ञाचा विश्वास गावकऱ्यांना वाटतो आणि सुरू होते अेक तेजस्वी कहाणी, सुरू होतो अेक प्रवास मरणाकडून जीवनाकडे, अंधारातून प्रकाशाकडे, विनाशातून समृद्धीकडे.

राजेंद्रसिंह यांच्या या विलक्षण, असामान्य कार्याच्या कहाणीने माझ्या अंतर्मनाचा वेध घेतला आणि त्या क्षणी हृदयावर कौल झाला की या तरुण वीरनायकाची. ग जोहडवाल्या बाबाची आणि त्याने केलेल्या अपूर्व संघर्षाची चरित कथा शब्दबद्ध करायचीच.



छायाचित्रे : सौजन्य 'तरुण भारत संघ'

सुमेरु